**एमएमआरडीएच्या १५८व्या प्राधिकरण बैठकीत मुंबई महानगर प्रदेशात मोठ्या विकास प्रकल्पांना मान्यता**

**मुंबई, २४ सप्टेंबर २०२४:** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांची १५८ वी प्राधिकरण बैठक आज माननीय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) दळणवळण, पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकास वृद्धी करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बैठकीत काही महत्त्वाच्या शहरी प्रकल्पांवरही चर्चा झाली. तसेच बॅकबे रिक्लमेशनसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी विकास आराखड्यांचे पुनरावलोकन करण्यावर देखील भर देण्यात आला.

**महत्त्वपूर्ण घडामोडी आणि निर्णय**

**१. बॅकबे रिक्लमेशन विकास आराखडा पुनरावलोकन:**

बॅकबे रिक्लमेशन योजनेच्या (ब्लॉक III ते VI) सुधारित मसुदा विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. हा आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ अंतर्गत तयार करण्यात आला आहे. या पुनरावलोकनात या भागात सुरु असलेल्या इतर शासकीय व अशासकीय संस्थांच्या प्रकल्पांचा म्हणजेच झोपडपट्टी पुनर्वसन आणि मेट्रो प्रकल्पांचा विचार करण्यात आला आहे.

या मसुदा आराखड्यात हा भाग निवासी आणि व्यावसायिक विभागांत विभागण्यात आला आहे. तसेच समुद्रकिनारे आणि खारफुटीसारख्या नैसर्गिक वैशिष्ट्यांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. यामध्ये नवीन विधानभवनाचा विस्तार आणि नवीन जोडरस्त्यांचा समावेश आहे. यात नेताजी सुभाषचंद्र मार्ग आणि जगन्नाथ भोसले मार्ग यांच्यातील जोडणी प्रस्तावित आहे. या शिवाय, पर्यटनाला चालना देण्यासाठी लहान बोटी आणि नौकांसाठी बंदर असलेली एक स्वतंत्र मरीना तयार करण्याचाही प्रस्ताव आहे.

**२. बदलापूर ते विरार मल्टीमोडल कॉरिडॉरसाठी ॲक्सेस-कंट्रोल्ड महामार्ग :**

बदलापूर, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर यांना मुंबई आणि नवी मुंबईशी जोडणाऱ्या ॲक्सेस-कंट्रोल्ड महामार्गाच्या प्राथमिक संरेखन अहवालाला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी सुमारे ₹१०,८३३ कोटी खर्च अपेक्षित असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर या शहरांमधून मुंबईत येण्यास लागणाऱ्या प्रवासाच्या वेळात ६० मिनिटांची तर नवी मुंबईपर्यंतच्या प्रवासाच्या वेळेत ३० मिनिटांची

बचत होणार आहे. हा महामार्ग नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि एनएआयएनएशी कनेक्टिव्हिटी करून देईल. तसेच ठाणे आणि जवळपासच्या महामार्गांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत करेल.

या प्रकल्पात ८ लेन असलेली विभाजित मार्गिका आणि सर्व्हिस रोड असतील. त्यामुळे ८० किमी प्रति तासाचा वेग कायम ठेवता येईल. प्रमुख मार्गांशी जोडण्यासाठी मोठ्या इंटरचेंजचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. यात मुंबई-वडोदरा स्पर, काटई-बदलापूर आणि कल्याण रिंग रोड यांचा समावेश आहे.

**३. वांद्रे कुर्ला संकुल (बीकेसी) येथे एनपीसीआयसाठी जमिनीचे वाटप :**

प्राधिकरणाने नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियासाठी (एनपीसीआय) वांद्रे कुर्ला संकुल येथे नवीन प्रशासकीय कार्यालयाच्या बांधकामासाठी व्यावसायिक भूखंड देण्याला मान्यता दिली. भारताच्या डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधांचा एक महत्त्वपूर्ण घटक असलेल्या एनसीपीआयसाठी ५ लाख चौरस फुटांचे बांधकाम क्षेत्र उपलब्ध होणार आहे. हा पुढाकार सरकारच्या मुंबईतील फिनटेक आणि डिजिटल इनोव्हेशनला प्रोत्साहन देण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत आहे.

**४. एमएमआरसाठी इकोनॉमिक मास्टर प्लानची अंमलबजावणी:**

मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, प्राधिकरणाने "प्रकल्प अंमलबजावणी युनिट" आणि "व्यवसाय विकास कक्ष" स्थापनेसाठी प्रशासकीय मंजुरी दिली. निती आयोग आणि महाराष्ट्र सरकार यांनी संयुक्तपणे महत्वाकांक्षी रोडमॅप तयार केला असून याच्या अंमलबजावणीनंतर एमएमआरला भारतातील केंद्रीय विकास केंद्राचे स्थान प्राप्त होईल.

या मास्टर प्लानच्या अंमलबजावणीसाठी २०२४-२५ साठी प्राधिकरणाने १०० कोटी रुपयांपर्यंतच्या प्रारंभिक बजेट मंजुरीस मान्यता दिली.

एमएमआरडीएच्या उपक्रमांमधून शहरी पायाभूत सुविधा सुधारण्याचे, दळणवळण वाढवण्याचे आणि प्रदेशातील आर्थिक विकासाला चालना देण्याचे सरकारच्या प्रतिबद्धतेचे प्रतिबिंब दिसून येते. विशेषत:, परिवहन आणि पर्यटनाशी संबंधित प्रस्तावित विकास कामे मुंबईला एक गतिमान जागतिक शहर आणि आर्थिक केंद्र म्हणून अधिक मजबूत करतील.

माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीदरम्यान या प्रदेशाच्या क्षमतेचा पुनरुच्चार केला आणि म्हणाले, "एमएमआरचे भारताच्या आर्थिक परिप्रेक्ष्यात एक महत्त्वपूर्ण स्थान आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसहसारख्या जागतिक पातळीवरी संस्थांसोबत धोरणात्मक नियोजन आणि सहकार्याच्या माध्यमातून, आम्ही मुंबईला एक जागतिक शहर म्हणून सतत प्रगतीशील ठेवू. हा इकोनॉमिक मास्टर प्लान आपल्याला शाश्वत विकासाच्या दिशेने मार्गदर्शन करेल, ज्यामुळे व्यवसाय आणि रहिवाशांसाठी संधी निर्माण होतील. या सुधारित विकास

आराखड्यात आधुनिकीकरण, पर्यावरण संवर्धन आणि स्थानिक लोकसंख्येच्या सामाजिक-आर्थिक गरजांमध्ये संतुलन राखण्यात आले आहे. प्रस्तावित नवीन विधानभवन आणि 'मरीना' पर्यटन प्रकल्पांमुळे या क्षेत्रातील उपजीविका किंवा पर्यावरणाला कोणताही अडथळा निर्माण न करता या प्रदेशाला महत्त्वपूर्ण फायदे मिळतील."

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, आयएएस, यांनी शाश्वत आणि सर्वसमावेशक शहरी विकासासाठी प्राधिकरणाच्या वचनबद्धतेवर भर दिला. ते म्हणाले, " एमएमआरडीएमध्ये आम्ही संतुलित वाढीवर लक्ष केंद्रित करत आहोत. यामध्ये पायाभूत सुविधा विकास, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक समुदायांचे कल्याण एकत्रित केले जाते. सुधारित विकास योजना आणि बॅकबे रिक्लमेशन व ॲक्सेस कंट्रोल्ड महामार्गासारखे महत्त्वाचे दळणवळण प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. दळणवळण सुधारणे, आर्थिक विकासाला चालना देणे आणि प्रत्येक प्रकल्प क्षेत्राच्या नैसर्गिक व सामाजिक घटकांची काळजी घेत तो प्रकल्प अमलात आणणे हे आमचे ध्येय आहे."

**MMRDA's 158th Authority Meeting Paves the Way for Major Development Initiatives Across Mumbai Metropolitan Region**

**Mumbai, 24th September 2024:** The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) convened its 158th Authority meeting today, chaired by Hon. Chief Minister of Maharashtra, Shri Eknath Shinde. The meeting saw several key decisions aimed at enhancing connectivity, infrastructure, and economic development within the Mumbai Metropolitan Region (MMR). The meeting also focused on vital urban projects and the revision of development plans for strategic zones such as Backbay Reclamation.

**Key Developments and Decisions**

**1. Backbay Reclamation Development Plan Revision:**

A revised draft development plan for the Backbay Reclamation Scheme (Blocks III to VI) was presented, prepared under Section 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The revision takes into account ongoing projects by other government and non-government organizations in the area, including slum rehabilitation and metro projects.

The draft plan divides the area into residential and commercial zones, with special attention to natural features such as beaches and mangroves. It includes the expansion of the New Legislative Building and the introduction of new link roads, among them a proposed connectivity between Netaji Subhashchandra Marg and Jagannath Bhosle Marg. Additionally, a dedicated marina for tourism is proposed, which will include ports for small boats and yachts to boost tourism in the area.

**2. Access-Controlled Highway from Badlapur to Virar-Alibaug Multimodal Corridor:**

Administrative approval was granted for the preliminary alignment report of an access-controlled highway connecting Kalyan, Dombivli, Ulhasnagar, Ambernath, and Badlapur

with Mumbai and Navi Mumbai. The project, estimated at Rs. 10,833 crores, aims to cut travel time between these cities and Mumbai to 60 minutes and Navi Mumbai to 30 minutes. The highway will provide direct connectivity to the upcoming Navi Mumbai International Airport and NAINA, while also reducing congestion in Thane and nearby highways.

The project will feature an 8-lane divided carriageway with service lanes, ensuring a design speed of 80 km/h. Major interchanges are proposed with key roadways, including the Mumbai-Vadodara Spur, Katai-Badlapur and the Kalyan Ring Road.

**3. Allotment of Land for NPCI at Bandra Kurla Complex (BKC):**

The Authority also approved the allotment of a commercial plot at BKC for the construction of a new administrative office for the National Payments Corporation of India (NPCI). NPCI, a key player in India's digital payment infrastructure, will benefit from a built-up area potential of 5 lakh sq. ft. This initiative aligns with the government's focus on promoting fintech and digital innovation in Mumbai.

**4. Implementation of Economic Master Plan for MMR:**

As a part of the broader vision to develop the Mumbai Metropolitan Region into a global economic hub, the Authority gave administrative approval for the formation of a dedicated "Project Implementation Unit" and a "Business Development Cell" to execute the region's Economic Master Plan. This ambitious roadmap, jointly developed by NITI Aayog and the Maharashtra Government, will position MMR as a central growth hub in India.

The Authority also granted initial budgetary approvals of up to Rs. 100 crores for 2024-25 to kick-start the execution of this master plan.

MMRDA's initiatives reflect the government's commitment to improving urban infrastructure, enhancing connectivity, and promoting economic growth in the region. The proposed developments, especially those related to transport and tourism, will bolster Mumbai's standing as a dynamic global city and economic powerhouse.

The Hon. Chief Minister, Shri Eknath Shinde, reiterated the region's potential during the meeting, saying,

The MMR holds a critical position in India's economic landscape. Through strategic planning and collaborative efforts with global entities such as the World Economic Forum, we will ensure that Mumbai continues to thrive as a global city. This Economic Master Plan will guide us towards sustainable development, creating opportunities for businesses and residents alike, Also This revised development plan reflects a careful balance between modernization, environmental conservation, and the socio-economic needs of the local population. The proposals, such as the new legislative building and the 'Marina' tourism project, will bring significant benefits to the region without disrupting the livelihoods or ecology of the area."

Dr Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner of MMRDA, emphasized the Authority's commitment to sustainable and inclusive urban development, stating, At MMRDA, we are focused on creating a balanced approach to growth that integrates infrastructure development, environmental conservation, and the well-being of local communities. The revised development plans and major connectivity projects, such as the Backbay Reclamation and the access-controlled highway, are critical to shaping the future of the Mumbai Metropolitan Region. Our vision is to enhance connectivity, promote economic growth, and ensure that every project respects the natural and social fabric of the region."